

# प्रवास

दूर चालला पक्षी, अंतराचे भय नाही
पंखात उरली आशा, आकाश संपले नाही
त्यास कळले जेंव्हा, हा प्रवास प्रारब्धाचा
उगाच तुटला जीव, श्रमास मोल नाही ॥ १ ॥

उलगडले वाटे कोडे, गूढ उकल परतीची
संदर्भ किती जुळवावे, प्रश्नांना शेवट नाही
काळोख नभातून विरता, आवेग बरसला नाही
हृदयात जुनी विराणी, डोळ्यांना ओलही नाही ॥ २ ॥

हे देणे संयमाचे, कसे काय परतावे
शिल्लक अजून मात्र, देणे संपत नाही
नभ कुठे पोकळसे, त्यांना नसती वासे
निराधार अंबर तरीही, काही म्हणणे नाही ॥ ३ ॥

कोणास विचारू मार्ग, कसे तिथे पोहोचावे
वाटेत निव्वळ गर्दी, बैरागी दिसला नाही
मग ओलांडून आशा, झुगारून समज सारे
प्रवास संपता कळले, कोणीच शहाणा नाही ॥ ४ ॥

जे ओंजळीत उरले, त्याचा मर्म खुलासा
जे जपलेसे सत्य, अन्य काहीच नाही
मी पोचलो उशिरा, हिशेब संपले तोवरी
जरी उरलो मागे, रांग वेगळी नाही ॥ ५ ॥

– सपु – सचिन पुरुषोत्तम कुलकर्णी